
http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये




सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
२० वर्षे
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट





# देवा भाऊंकडून विरोधकांचा हिशोब चुकता! मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना 346 कोटी 31 लाखांचा निधी

- नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळत असून या निधीचे वितरण दिवाळीनंतरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा हण्याची शक्यता!
- शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावल्यामुळे राज्य सरकारने गेल्या पंधरवड्यातील हा चौथा मदतीचा अध्यादेश केला जारी
- शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, नुकसानीचा अंदाज जास्त असून मंजूर झालेली रक्कम अत्यंत तुटपुंजी आणि अपुरी!!

## बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी 67 लाख 24 लाख निधी मंजूर

बीड : मराठवाडा विभागातील अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. सरकारने एकूण 346 कोटी 31 लाख 70 हजार रुपयांचा मदत निधी मंजूर केला आहे. मात्र, या निधीचे वितरण दिवाळीनंतरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. या निर्णयामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी प्रत्यक्ष मदत मिळण्यास उशीर होणार असल्याने शेतकऱ्यांची चिंता कायम आहे.



### अमलबजावणी आणि वेळेवर वितरण हाच खरा प्रश्न

अतिवृष्टीमुळे फक्त खरीप पिकांचे नुकसान झालं नाही तर अनेक ठिकाणी रब्बी हंगामाची तयारी अडचणीत आली आहे. शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत. बियाणं, खतं आणि मजुरी यासाठी त्यांना अतिरिक्त कर्ज घ्यावं लागत आहे. सरकारकडून मिळणाऱ्या मदतीची प्रतीक्षा आता अधिक वाढली असून ती दिवाळीनंतर मिळेल या अंदाजामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. राज्य सरकारने मंजूर केलेल्या 346 कोटी रुपयांचा निधी हा मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासा ठरणार असला तर त्याची अंमलबजावणी आणि वेळेवर वितरण हाच खरा प्रश्न आहे.



### पंधरवड्यातील हा चौथा मदतीचा अध्यादेश जारी!

जून ते सप्टेंबर या काळात मराठवाड्यात सलग पावसाने थैमान घातले होते. या काळात अनेक जिल्ह्यात नदी नाल्यांना पूर आले, घर आणि शेती पिकं वाहून गेली. तीन लाख 58 हजार 612 शेतकऱ्यांचे तीन लाख 88 हजार हेक्टर वरील पिक पूर्णपणे उध्वस्त झाली. काही भागांमध्ये शेतजमीनी वाहून गेल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले. त्यामुळे राज्य सरकारने गेल्या पंधरवड्यातील हा चौथा मदतीचा अध्यादेश जारी केला आहे. या अंतर्गत मराठवाड्यातील सात जिल्ह्यांना मदत वितरित केली जाणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे स्थानिक प्रशासनाकडून नुकसानीचे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा केले जातील. मात्र, प्रशासकीय प्रक्रिया आणि निधी हस्तांतरणाच्या टप्प्यांमुळे ही रक्कम दिवाळीनंतरच उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### जिल्हानिहाय मदतीचे वितरण

राज्य सरकारने जाहीर केलेल्या निधीचे वाटप खालील प्रमाणे करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| संभाजीनगर : | 81 कोटी 62 लाख |
| बीड : | 67 कोटी 24 लाख |
| लातूर : | 35 कोटी 72 लाख |
| परभणी : | 49 कोटी 42 लाख |
| जालना : | 64 कोटी 75 लाख |
| हिंगोली : | 11 कोटी 30 लाख |
| नांदेड : | 36 कोटी 22 लाख |
| एकूण मदत निधी : | 364 कोटी 31 लाख 70 हजार |

या रकमेमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळेल, असा राज्य सरकारचा दावा आहे.

### नुकसानीचा अंदाज जास्त असून मंजूर झालेली रक्कम अपुरी

राज्य शासनाच्या निर्णयानुसार दोन ते तीन हेक्टरपर्यंत पीक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे. तथापि अनेक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, नुकसानीचा अंदाज जास्त असून मंजूर झालेली रक्कम अपुरी आहे. तसेच दिवाळीच्या आधी ही मदत मिळाल्यास खरीप हंगामातील नुकसानीतून बाहेर पडण्यास काहीसा आधार मिळाला असता अशी खंतही शेतकरी व्यक्त करत आहेत. राज्य शासनाकडून सांगण्यात आले आहे की, सर्व जिल्ह्यांनी आपापल्या महसूल यंत्रणेकडून शेतकऱ्यांचे तपशील आणि नुकसान अहवाल सादर केले आहेत. आता निधीचे तांत्रिक वाटप व मंजुरी प्रक्रिया सुरू आहे. निधी वितरित करण्यासाठी केंद्र सरकारकडून मंजुरी आणि निधी हस्तांतरणाचे अंतिम टप्पे सुरू आहेत.

## राजयोग फाऊंडेशन रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्या वतीने हजारो कुटुंबीयांना दिवाळी फराळ व दिवाळी सणाचे साहित्य वाटप

➤ १५ संस्था व आश्रमांसहित अतिवृष्टीने बाधित झालेल्या कुटुंबीयांचाही यात समावेश

➤ बीड : प्रतिनिधी

फराळाशिवाय दिवाळी हे समीकरणच जुळत नाही. काहीसा गोड, काहीसा तिखट पण चविष्ट असणारा दिवाळीतील महत्त्वपूर्ण ठेवा म्हणजे फराळ.

राजयोग फाऊंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन च्या वतिने दिवाळी सणानिमित्त गोरगरिबांच्या घरात आनंदोत्सव साजरा व्हावा, गरजु कुटूंबांची दिवाळी आनंदाने साजरी व्हावी यासाठी राजयोग फाउंडेशन व रोटरी मागील ९ वर्षांपासून निस्वार्थ भावनेतून हे समाजसेवेचे कार्य अविरत पार पाडत आहेत.




यानिमित्ताने हजारो निराधार गरजवंत कुटुंबांसह शहरातील दिव्यांगांना दिवाळी फराळ व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच जिल्ह्यातील सुमारे १५ वेगवेगळ्या वृद्धाश्रम, बालकाश्रम व निराधार केंद्रातील आश्रय दात्यांना देखील लाभ देण्यात आला. तसेच या वर्षी मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीने बाधित झालेल्या कुटुंबीयांना देखील फराळाचे वाटप केले. यामधे पसायदान प्रकल्प-ढेकणमोह, आपला परिवार-नेकनुर, लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे वृद्धाश्रम- घाटसावळी, शांतिवण- आर्वी, ● पान ४ वर...

## जि.प. निवडणूक लढविण्याची प्रज्ञाताई कुलकर्णी यांची तयारी!

➤ विहामांडवा येथील मुस्लिम कब्रस्तान व हिंदूंच्या स्मशानभूमीला सुरुवातीला त्यांनीच दिला होता निधी



विहामांडवा : इम्तीयाज शेख

नुकतेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे आरक्षण जाहीर झाले असून विहामांडवा जिल्हा परिषद गटात विहामांडव्याच्या माजी पंचायत समिती सदस्या प्रज्ञाताई संजय कुलकर्णी हे राष्ट्रवादी (अजिज पवार) पक्षाच्या वतीने आपण विहामांडवा जिल्हा परिषद या गटातून निवडणूक लढणार असून पक्षाने दिलेल्या संधीचे सोने करणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

प्रज्ञाताई कुलकर्णी या माजी पंचायत समिती ● पान २ वर...



➤ राज्यमंत्री योगेश कदम यांनी उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांच्या तक्रारीची घेतली दखल

## म्हाळसजवळा ग्रामपंचायतचा आतापर्यंतचा सगळा काळाबाजार बाहेर निघणार



➤ बीड : प्रतिनिधी

शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांनी मा.ना. योगशजी कदम, राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालयास अर्ज देवून कळविले होते की, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार जवळा येथील सरपंच व ग्रामसेवक यांनी सन २०१७- ऑगस्ट २०२५ पर्यंत अधिकार व कर्तव्य पार न पाडता मासीक सभा, ग्रामसभा, व इतर बैठका, शासकीय रक्कमेच्या नोंदवहया स्टॉक रजिष्टर, अनुदान रक्कमा लेखा परिक्षण, वार्षीक लेखा वितरण पत्र, जमा खर्च, वार्षीक अहवाल, मासीक लेखा व वसुली रक्कम. निविदा, कार्यालय, शाळा, मोबाईल टॉवरचा कर आकारणे, व इतर तक्रारी व मुद्दे सदर अर्जात नमुद केले होते.

पंचायत राज अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण वऔषध प्रशासन माहराष्ट्र राज्य यांनी सदर पत्राच्या पृष्ठांनाकावर तपासून कार्यवाही करणे बाबत शेरा दिलेला आहे. त्याचबरोबर यापूर्वी नरेगा कामांमध्ये झालेल्या अपहाराबद्दल ज्ञानेश्वर खांडे यांनी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे पाठपुरावा करून नरेगा या कामाची चौकशी लावली त्याच लागोपाठ ● पान ४ वर...

## भाजपचे युवा नेते डॉ. धनराज पवार विडा पं.स. निवडणुकीसाठी भाजपचे प्रबळ दावेदार!

**जनतेतून आग्रही मागणी डॉ. धनराज पवार यांनी विडा पंचायत समिती निवडणूक लढवावी!**

➤ केज : केज तालुक्यातील विडा येथील एक कर्तृत्ववान आणि सर्वसामान्य कुटुंबातील युवक नेतृत्व, डॉ. धनराज पवार, हे आगामी विडा पंचायत समिती गणाच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाकडून (भाजप) एक प्रबळ आणि महत्त्वपूर्ण दावेदार म्हणून डॉ. धनराज पवार समोर येत आहेत. विशेष म्हणजे, महाराष्ट्र राज्याच्या मंत्री मा. पंकजाताई मुंडे, माजी खा. प्रितमताई मुंडे आणि ● पान २ वर...



चिंचोली लिंबाजी जिल्हा परिषद सर्कल मध्ये दिग्गज राजकारण्यांना धक्का देत

## सोशल मीडियाचा ट्रेंड असलेला गजानन गवळी हा तरुण जिल्हा परिषदसाठी इच्छुक!

➤ चिंचोली लिंबाजी : सचिन गुरव



कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी जिल्हा परिषद सर्कल म्हणजे दिवाळीच्या ऐन मुहूर्तावर राजकारण्यांची जिल्हा परिषद पंचायत समिती साठी लागलेली तिकिटाची रस्सीखेच आणि तिकीट कोणाला भेटणार याची अपेक्षा कुठला पक्ष कुणाला कुणाला टिकीट देणार या चर्चेने सध्या चिंचोली लिंबाजी सर्कल मध्ये खूप मोठी रंगत आणली आहे. राजकारणातील जुन्या टोपीवाले धोत्रा वाले यांचे राजकारण पाठीमागे टाकत काही कडक खादी घालणारे तरुण आता मैदानात उतरले आहे. सोशल मीडियावर चर्चेत असलेली गजानन गवळी हे रायभान जाधव आघाडीचे कार्यकर्ते मानल्या जातात ● पान २ वर...




## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.





# लक्ष्मीपूजन: धन, समृद्धी आणि ऐश्वर्याचे स्वागत!



विशेष

● प्रणाली म्हात्रे विक्रोळी, मुंबई

लक्ष्मीपूजन हा हिंदू धर्मातील अत्यंत महत्त्वाचा सण आहे, जो दिवाळीच्या पाच दिवसांच्या उत्सवातील मुख्य दिवस मानला जातो. हा सण दरवर्षी आश्विन महिन्यातील अमावास्येला (दिवाळीचा मुख्य दिवस) संध्याकाळी साजरा केला जातो. या दिवशी स्थिर धन, समृद्धी आणि ऐश्वर्य यांची देवी माता लक्ष्मी, बुद्धी व शुभ–लाभ देणारे श्री गणेश आणि धनाचे रक्षण करणारे देव कुबेर यांची विधिवत पूजा केली जाते.

### लक्ष्मीपूजनाचे महत्तव

लक्ष्मीपूजन केवळ पैसा किंवा संपत्ती मिळवण्यासाठी केले जात नाही, तर ते स्थिर धन, आरोग्य, यश, ऐश्वर्य आणि मानसिक शांती प्राप्त करण्यासाठी केले जाते. अशी धार्मिक श्रद्धा आहे की, दिवाळीच्या रात्री माता लक्ष्मी पृथ्वीवर संचार करते आणि जे भक्त आपले घर स्वच्छ ठेवून, दिव्यांची रोषणाई करून तिचे स्वागत करतात, त्यांच्या घरी ती स्थिर (कायमस्वरूपी) स्वरूपात वास करते. लक्ष्मीसोबत बुद्धीचे देवता श्री गणेश यांची पूजा केल्याने व्यक्तीला बुद्धी आणि शुभ–लाभ प्राप्त होतात. तसेच, धनाचे रक्षक असलेल्या कुबेर देवांची पूजा केल्याने धनाचे रक्षण होते आणि ते योग्य मार्गाने वापरले जाते. घरात लावले जाणारे दिवे (पणत्या) हे अंधारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतीक आहेत, ज्यामुळे घरातून दारिद्र्य आणि नकारात्मकता दूर होते. या दिवशी केरसुणीचे (झाडूचे) पूजन केले जाते, कारण केरसुणी घरातून दारिद्र्य आणि अलक्ष्मी (नकारात्मक ऊर्जा) घालवून टाकते, म्हणून तिला देवीस्वरूप मानले जाते. व्यापारी वर्ग या दिवशी नवीन खातेवह्या (चोपडा) किंवा जमा–खर्चाच्या वह्यांची पूजा करून त्यांच्या व्यवसायात वृद्धीसाठी लक्ष्मीला प्रार्थना करतात.

### शुभ मुहूर्त आणि पूजाविधी

यंदा लक्ष्मीपूजन प्रदोष काळात (सूर्यास्तानंतर) करणे अत्यंत शुभ मानले जात आहे. ज्योतिष तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सायंकाळी ६ वाजून १० मिनिटांपासून ते रात्री ८ वाजून ४० मिनिटांपर्यंत पूजेसाठी उत्तम शुभ मुहूर्त आहे. या स्थिर मुहूर्तावर लक्ष्मीचे पूजन केल्यास घरात स्थिर लक्ष्मीचा वास होतो, अशी श्रद्धा आहे.

### पूजेचा विशेष विधी

घरोघरी आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांमध्ये आज सायंकाळी स्वच्छता करून, रांगोळ्या काढून दिव्यांची रोषणाई केली जाते. देवी लक्ष्मी आणि गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून पंचोपचार किंवा षोडशोपचार पूजा केली जाते. पूजा करताना धन, संपत्ती, नवीन खातेवह्या (चोपडा) आणि सोन्या–चांदीचे दागिने यांची पूजा करावी.

लक्ष्मीपूजन हा दिवस व्यापारी वर्गासाठी नवीन आर्थिक वर्षाचा प्रारंभ मानला जातो. या दिवशी नवीन खातेवह्यांची (चोपडा पूजन) पूजा करून पुढील वर्षभर व्यवसायात भरभराट व्हावी यासाठी प्रार्थना केली जाते. आजच्या या मंगलमय दिवशी प्रत्येक घरात सुख, समृद्धी, आरोग्य आणि ऐश्वर्य नांदावे यासाठी माता लक्ष्मीला प्रार्थना करावी. आरतीनंतर हात जोडून माता लक्ष्मीला घरात दीर्घकाळ निवास करण्याची प्रार्थना करावी आणि पूजेत काही चूक झाली असल्यास क्षमा मागावी. रात्री संपूर्ण घरात पणत्यांची रोषणाई करावी.

# आली माझ्या घरी ही दिवाळी....!!!





विशेष

रुपाली देशपांडे
बीड. संपर्क – 8888955539

दिवाळी हा एक प्रमुख हिंदू सण आहे. हा दीपोत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. या सणाला घरात व घराबाहेर तेलाचे लहान दिवे लावले जातात. उंच जागी आकाशदिवा (आकाशकंदिल) लावला जातो. घराबाहेर रांगोळी काढून सुशोभन केले जाते. पावसाळा संपून नवीन पिके हाती आल्यानंतर शरद ऋतूच्या ऐन मध्यभागी, आश्विन व कार्तिक या महिन्यांच्या संधिकालात हा सण येतो. आश्विन वद्य द्वादशी ते कार्तिक शुद्ध द्वितीया हे सहा दिवस या सणाचे असतात. हा सण साधारणपणे ऑक्टोबर – नोव्हेंबर दरम्यान येत असतो.

उपलब्ध पुराव्यांनुसार दिवाळी हा एक प्रमुख हिंदू सण हा सण किमान तीन हजार वर्षे जुना आहे. या सणाचा उगम फार प्राचीन काळी, आर्यांचे वास्तव्य उत्तर ध्रुव प्रदेशात होते, त्या काळातच झाला असा समज आहे. तथापि वैदिक काळात आश्विन महिन्यात शरद ऋतूचे औचित्य साधून आश्वयुजी किंवा आग्रयण यासारखे यज्ञ केले जात असत, ज्यांचा समावेश सात पाकयज्ञांमध्ये होतो. परंतु या धार्मिक आचारात दिवाळीचे प्राचीन संदर्भ सापडतात, असे नेमके म्हणता येतेच असे नाही, असे मत बी. के. गुप्ते यांनी आपल्या फोकलोअर ऑफ दिवाली या पुस्तकात मांडले आहे.

चौदा वर्षांचा वनवास संपवून रामचंद्र सीतेसह अयोध्येला परत आला, तो याच दिवसात. पण त्यावेळी त्याचे स्वरूप आजच्यापेक्षा खूपच भिन्न होते. प्राचीन काळी हा यक्षांचा उत्सव मानला जायचा. अंधार दूर करुन प्रकाशाचे अस्तित्व निर्माण करणारा दीप मांगल्याचे प्रतीक मानला जातो. याच्या प्रकाशाने आपल्या जीवनातील अंधकार दूर व्हावा म्हणून हा दीपोत्सव साजरा केला जातो. पावसाळ्यातील समृद्धीच्या, आनंद उत्सवाचा, कृतज्ञतेचा हा सोहळा मानला जातो. या दिवसांत सायंकाळी दारात रांगोळ्या काढून पणत्या लावतात, घरांच्या दारात आकाशदिवे लावले जातात. महाराष्ट्रात व इतर ठिकाणी लहान मुले या काळात मातीचा किल्ला तयार करतात. त्यावर मातीची खेळणी मांडतात. धान्य पेरतात. यामागची परंपरा कशी व केव्हा सुरू झाली याची नोंद नाही.

दिवाळी हा एक प्रमुख हिंदू सणचे मूळचे नाव यक्षरात्री असे होते हे हेमचंद्राने नोंदवले आहे, तसेच वात्स्यायनाच्या कामसूत्रातही हेच नाव नोंदलेले आहे. नीलमत पुराणया ग्रंथात या सणास "दीपमाला" असे म्हटले आहे. कनोजाचा राजा हर्षवर्धन याने नागानंद नाटकात या सणाला "दीपप्रतिपदुत्सव" असे नाव दिले आहे. ज्योतिषरत्नमाला या ग्रंथात "दिवाळी" हा शब्द वापरला आहे. भविष्योत्तर पुराणात दिवाळीला "दीपालिका" म्हटले आहे, तसेच काल्विवेक या ग्रंथात तिचा उल्लेख "सुखरात्रि" असा येतो. व्रतप्रकाश नावाच्या ग्रंथात "सुख सुप्तिका" म्हणून दिवाळी ओळखली जाते

पान १ वरून

## जि.प. निवडणूक लढविण्याची प्रज्ञाताई कुलकर्णी यांची तयारी!

● पान १ वरून... सदस्या असून त्यांचे पती संजय कुलकर्णी हे देखील राजकीय क्षेत्रात कायम कार्यरत आहेत. शिवाय त्यांचा विहामांडवा सर्कलमध्ये जनसंपर्क देखील आहेत. आगामी निवडणुकीमध्ये नशीब आजमवण्यासाठी त्यांनी तयारी सुरू केली आहे.

विहामांडवा पंचायत समिती सदस्या पद त्यांनी भूषवले असून या काळात त्यांनी विविध विकासकामे केली आहे. विहामांडवा येथील मुस्लिम कब्रस्तान व हिंदूंच्या स्मशानभूमीला सुरुवातीला त्यांनीच निधी दिला होता.

यावेळी प्रज्ञाताई पुढे म्हणाले की माजी पंचायत समिती सदस्य म्हणून मी अनेक चांगले कामे केली कधी जातीवाद केला नाही कोणत्याही समाजाचा माणूस त्याचे काम करण्याचा प्रयत्न केला व विहामांडवा सर्कल मधील नागरिकांना अभिमान वाटावा अशी पंचायत समिती सदस्य म्हणून मी आपल्या कामाचा ठसा उमटवला. विहामांडवा येथे नळाला पाणी येत नव्हते त्यावेळेस मी छत्रपती संभाजी नगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य असा आंदोलन करून निधी मिळवून दिला होता परंतु श्रेय घेण्यासाठी मी कमी पडले होते अन्यथा आज देखील विहामांडवेमध्ये पाण्यासाठी झटणारी लोकप्रतिनिधी म्हणून माझी ओळख आहे. यासाठी विहामांडवा पाणी आंदोलन असे टाईप करून युट्युब वर गेल्यास त्याकाळी मी केलेल्या आंदोलनाचे अनेक क्लिप तुम्हाला पाहावयास मिळतील. विहामांडवा व गणातील अनेक गावात मी पंचायत समिती सदस्य असताना वैयक्तिकरित्या अनेकांना लाभ मिळून दिला.

ताडपत्री, सौर ऊर्जा वरचे बल्प, पाईपचे वाटप केले. विहामांडवा येथील आरोग्य केंद्र मध्ये डॉक्टरची उपस्थिती रहावे व आरोग्य केंद्र मध्ये डॉक्टर नसल्यास डॉक्टर मिळून देण्यासाठी अनेक वेळेस प्रयत्न केले. महिलांनी स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे राहावे म्हणून कौशल्य विकास महामंडळातर्फे अनेक महिलांना मोफत शिवण क्लास ब्युटी पार्लर कोर्स स्वतः शिकवलेले आहेत व काही महिला सक्षमपणे या माध्यमातून उभे देखील राहिलेले आहेत.

पैठण येथे मी पंचायत समिती सदस्य असताना संजय गांधी निराधार मध्ये वयोवृद्धांचा सहभाग असावा म्हणून मोठे आंदोलन केले होते. त्यावेळी अनेकांना मी संजय निराधार योजना श्रावण बाळ योजनाचे फायदे मिळून दिलेले आहेत. अनेकांना दारिद्र रेषे खालील कार्ड मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले, विहामांडवा व परिसरातील नागरिकांना मोफत नंबरचा चष्मा वाटपाचे अनेक कार्यक्रम घेतले आहे.

माझे सासरी डॉक्टर के डी कुलकर्णी उर्फ राघू डॉक्टर यांनी देखील विहामांडवा व परिसरातील नागरिकांना ५० वर्षे वैद्यकीय सेवा दिली. त्याचप्रमाणे जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून विहामांडवा येथे ज्ञानदीप विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय चीस्थापना करून शैक्षणिक क्षेत्रात देखील उत्तम काम केलेले आहे. माझे पती संजय कुलकर्णी हे देखील गेले ३० वर्ष सार्वजनिक जीवनात आहेत त्यांनी व त्यांच्याबरोबर स्व. गुलाब लोंढे, स्व. सुरेश गागरे यांनी देखील विहामांडवा येथे १२वी परीक्षा केंद्र मिळावे म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील बारावीच्या बोर्डापुढे अमरण उपोषण केले होते व १२ वि परीक्षा केंद्र मंजूर करून आणले होती. त्याचप्रमाणे माझे पती संजय कुलकर्णी व विजय नवपुते रघुनाथ पाटील डुकरे ताराचंद नवपुते रमेश देशमाने यांनी देखील विहामांडवा येथे रेणुका देवी शरद सहकारी साखर कारखाना सुरू व्हावा म्हणून उपोषण केले होते असे अनेक सामाजिक शैक्षणिक कामाच्या माध्यमातून विहामांडवा सर्कलमध्ये मी व माझ्या कुटुंबाने चांगले काम करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यामुळे आगामी येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा गटातर्फे उमेदवारी अर्ज भरणार आहे तरी विहामांडवा विभागातील मतदार बंधू–भगिनींना विनंती करते की तुम्हाला अभिमान वाटेल असा जिल्हा परिषद सदस्य म्हणून मी काम करीन व आपल्या संपर्कात सतत राहील कारण मी विहामांडवा येथे स्थानिक असल्याने मला जर जिल्हा परिषदवर जाण्याची संधी दिली तर नक्कीच संधीचे सोने केल्याशिवाय मी शांत बसणार नाही.

सर्कलमध्ये असलेल्या सर्व गावांना समान न्याय देऊन विकासकामे करण्यावर माझा भर राहील. तरी सर्वांनी सहकार्य करावे हीच अपेक्षा यावेळी माजी पंचायत समिती सदस्य सौ. प्रज्ञा संजय कुलकर्णी यांनी भावना व्यक्त केल्या आहे.

## सोशल मीडियाचा ट्रेंड असलेला गजानन गवळी हा तरुण जिल्हा परिषदसाठी इच्छुक!

● पान १ वरून... सोशल मीडियाच्या माध्यमातून नेहमी चर्चेत असलेली गजानन गवळी हे सर्कल मधील लोकांना अडचणीच्या वेळेस मदत करतातच पण इतर तालुक्यातील लोकांना सुद्धा मदत करण्यात त्यांचा खारीचा वाटा आहे. नेमका चिंचोली लिंबाजी जिल्हा परिषद सर्कल सर्वसाधारण पुरुष जागा असल्याने गजानन गवळी इच्छुक असल्याचे त्यांच्या जवळच्या खात्रीलायक सूत्रांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. गजानन गवळी हे रिंगणात आल्यानंतर जिल्हा परिषद निवडणुकीला चांगलीच रंगत येणार असल्याचे चित्र दिसते घरची राजकीय पार्श्वभूमी नसलेले गजानन गवळी ग्रामपंचायत लोहगावचे जनक जरी असले जिल्हा परिषद चिंचोली सर्कल मध्ये ते चर्चेत राहणार ही गोष्ट मात्र तितकीच खरी.

## भाजपचे युवा नेते डॉ. धनराज पवार विडा पं.स. निवडणुकीसाठी भाजपचे प्रबळ दावेदार!

केज–अंबाजोगाई मतदारसंघाचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर(काकाजी) मुंदडा, केज मतदार संघाच्या कार्यसम्राट लोकाभिमुख आमदार नमिताताई मुंदडा, युवक नेते अक्षय भैय्या मुंदडा यांचे निकटवर्तीय म्हणून डॉ. पवार यांची ओळख आहे, ज्यामुळे त्यांच्या उमेदवारीला अधिक बळ मिळत आहे.

सामाजिक कार्याचा प्रदीर्घ अनुभव आणि जनतेचा विश्वास

डॉ. धनराज पवार यांचा प्रवास सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून सुरू झाला आहे. गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून ते सामाजिक आणि राजकीय कार्यात अत्यंत सक्रिय आहेत. त्यांची ही निष्ठा आणि सातत्य यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये त्यांच्याविषयी मोठा विश्वास आणि आदर आहे. लोकांच्या कामाचा माणूस' म्हणून डॉ. पवार यांच्याकडे पाहिले जाते.

विडा ग्रामपंचायतीतील यशस्वी कारकीर्द :

सध्या ते विडा ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. या पदावर असताना त्यांनी जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या कार्यकाळात त्यांनी ग्रामस्थांच्या सुख–दुःखात, अडी–अडचणीत कायमस्वरूपी सहभागी होऊन त्यांना आधार दिला आहे. वेळोवेळी रक्तदान शिबीर आरोग्य शिबीर यामुळे, आता पंचायत समितीच्या स्तरावर काम करण्याची त्यांची क्षमता आणि इच्छा जनतेला दिसत आहे.

जनतेतून आग्रही मागणी का?

डॉ. पवार यांनी आपल्या सामाजिक कार्यातून आणि ग्रामपंचायत सदस्यपदाच्या माध्यमातून जी विश्वासार्हता निर्माण केली आहे, त्यामुळेच विडा गणातील नागरिकांकडून त्यांना पंचायत समिती निवडणूक लढवण्याचा आग्रह केला जात आहे.

पारदर्शक कार्यशैली : त्यांची पारदर्शक आणि लोकाभिमुख कार्यपद्धती. सुलभ उपलब्धता : सर्वसामान्यांसाठी ते कायम उपलब्ध असतात. युवा आणि ऊर्जावान नेतृत्व : एक युवा आणि उत्साही नेतृत्व पंचायत समितीमध्ये आवश्यक असल्याची जनतेची भावना. प्रबळ दावेदारी सिद्ध :

भाजपकडून विडा गणासाठी अनेक इच्छुक उमेदवार असले तरी, डॉ. धनराज पवार यांची प्रदीर्घ सामाजिक कारकीर्द, ज्येष्ठ नेते नंदकिशोर (काकाजी) मुंदडा, आ. नमिताताई मुंदडा, अक्षय भैय्या मुंदडा यांचे निकटवर्तीय असणे, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जनतेतून होणारी आग्रही मागणी, या सर्व गोष्टींमुळे त्यांची दावेदारी इतर इच्छुकांच्या तुलनेत खूपच प्रबळ ठरत आहे.

येत्या काळात भाजप पक्षश्रेष्ठी डॉ. पवार यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब करण्याची शक्यता असून, तसे झाल्यास विडा पंचायत समिती गणाची निवडणूक अत्यंत चुरशीची होणार यात शंका नाही. विडा गणातील जनतेचे लक्ष आता भाजपच्या अधिकृत घोषणेकडे लागले आहे.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक – अरविंद ओव्हाळ (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922



## १० कोटींच्या चिनी फटाक्यांची तस्करी : डीआरआयच्या ऑपरेशन फायर ट्रेलची मोठी कारवाई

नवी दिल्ली : भारताच्या सीमांवरून चिनी फटाक्यांची बेकायदेशीर आयात करण्याचा मोठा डाव महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) हाणून पाडला आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बाजारात अवैधरीत्या चिनी फटाके आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या तस्कर टोळीचा पर्दाफाश करण्यात आला असून, सुमारे १० कोटी रुपये किमतीचे तब्बल १.३० लाख फटाके जप्त करण्यात आले आहेत.

'ऑपरेशन फायर ट्रेल' या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, देशातील दोन प्रमुख बंदरांवरून ही तस्करी उघडकीस आली आहे.

डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी न्हावा शेवा ● पान ४ वर ...

# अज्या आता 'लाखात एक आमचा दादा'

2017 ला आलेल्या 'लागीर झालं जी' या मालिकेने प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केलं. या मालिकेतील अज्या आणि शितली ही पात्र आजही प्रेक्षकांच्या मनात आहेत. 'लागीर झालं जी'मधील अज्या अर्थात अभिनेता नितीश चव्हाण पुन्हा एकदा झी मराठीवर कमबॅक करतो आहे. झी मराठीवरच्या एका नव्या मालिकेत तो दिसणार आहे. 'लाखात एक आमचा दादा' या मालिकेत नितीश चव्हाण पुन्हा एकदा दिसणार आहे. 'आईची माया लावणारा, लाखात एक आमचा दादा' अशी या मालिकेची टॅग लाईन आहे. ही मालिका लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.





### अज्या पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला

● सूर्या एक साधा किराणा दुकानदार असून सुद्धा प्रचंड हिशेबी काय असेल सुर्या आणि त्याच्या चार बहिणींची गोड, साधी पण सुंदर गोष्ट ? आणखी एक खास गोष्ट म्हणजे या मालिकेच्या निमित्ताने 'लागीर झालं जी' नंतर नितीश चव्हाण पुन्हा एकदा झी मराठीवर कमबॅक करत आहे. या मालिकेचं लेखन केलंय स्वप्नील चव्हाण आणि विशाल कदम यांनी तर मालिकेचे दिग्दर्शक आहेत किरण दळवी. 'वज्र प्रोडक्शन' या मालिकेची निर्मिती करणार आहेत. 'लाखात एक आमचा दादा' ही मालिका लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

### नितीशची नवी इनिंग

● सूर्यादादा. चार बहिणींचा भाऊ. स्वभावाने भोळसट, करारी मर्द, करड्या शिस्तीचा मात्र बहिणींच्या सुखासाठी, त्यांच्या रक्षणासाठी आणि त्यांची लग्न उत्तमोत्तम घरात लागावीत यासाठी दिवस रात्र जीवाचे रान करणारा लाखात एक असा भाऊ. मोठ्या दिलाचा राजामाणुस!

### मालिकेची गोष्ट काय आहे?

● सूर्यादादाला चार बहिणी. तेजू, धनु, राजू, भाग्या. तेजश्री एका शाळेत शिक्षिका आहे, तिला लहान मुलांचे प्रचंड वेड आहे आणि आयुष्याबद्दल ती प्रचंड आशावादी आहे. दुसरी बहिण धनश्री हिला सतत काहीतरी खायला लागतं. अंगाने जाड असल्याने सूर्याला तिच्या लग्नाची काळजी आहे. धनुला इंग्रजी विषयाशी वाकडे आहे. ती इंग्रजी पास होण्याची वाट सूर्याच नाही तर सगळं गाव पाहतंय, सूर्याची तिसरी बहिण राजश्री घरात लहान असूनही घरची काळजी घेणे रखरखाव करणे हिशेब करणे ती एकप्रकारे घरची फायनान्स मिनिस्टर आहे.

### सूर्या चारही बहिणींची आई झाला

● राजश्री शिकलेली नाही पण व्यवहारात चोख आहे. चौथी बहिण भाग्यश्री ही अजूनही शाळेत शिकते. तिला गाणे शिकायचे आहे. अशा या अतरंगी बहिणींचा सूर्या दादा आहे. लहानपणीच आई घर सोडुन पळून गेली. म्हणून सूर्या चारही बहिणींची आई झाला. प्रचंड शिस्तीने त्याने बहिणीना वाढवलं आहे. जेणेकरून उद्या कुणी तोंड वर करून असं बोलायला नको की आईविना वाढलेल्या मुली वाया गेल्या. असं असलं तरी बहिणींचं सूर्यावर प्रचंड प्रेम आहे.

---

### वास्तू दोष कसे दूर करायचे?

● जर घरात प्रवेश केल्यावर तुम्हाला ताजेतवाने वाटत नसेल. उदास वाटत असेल तर तिथे वास्तूदोष निर्माण झालेला असतो. ● तुम्ही तुमच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडू इच्छित नाही. ● तुमचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन निराशावादी होऊ लागतो. ● खूप कमी आनंद आणि उत्साह वाटतो. ● अनेकदा विनाकारण अडचणीत अडकतात. ● कौटुंबिक समस्याआणि तणावही वाढतो ● चुकीची माणसे भेटू लागतात. ● व्यवसाय, नोकरीमध्ये अडचणी येऊ लागतात. ● जर उत्तर-पश्चिम दिशेला वास्तू दोष असेल तर त्याचा दुष्परिणाम म्हणून कोर्टाशी संबंधित समस्या उद्भवतात. मानसिक त्रास होतो. ● तसेच आग्नेय कोपऱ्यात (दक्षिण-पूर्व) वास्तुदोष असल्यास घरात चोरी, कर्ज किंवा पैसा कुठेतरी अडकून पडतो ● रक्तदाब, मधुमेह सारख्या व्याधी मागे लागतात.

### वास्तू दोष दूर करण्यासाठी सोप्या स्मार्ट टिप्स

● वास्तूनुसार घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर शेंदूर लावून नऊ इंच लांब आणि नऊ इंच रुंद स्वस्तिक बनवावे. त्यामुळे सर्व प्रकारची नकारात्मक ऊर्जा आणि वास्तु दोष दूर होतात. ● दर मंगळवारी असे केल्याने मंगळ ग्रहाशी संबंधित दोषही दूर होतात. ● घरात साप, घुबड, कबूतर, कावळा, गरुड यांसारखे प्राणी आणि पक्षी यांचे पुतळे, चित्रे किंवा चित्रे लावणे टाळावे. ● बेडरूममध्ये देवाचे, पाण्याचे किंवा धबधब्याचे कोणतेही चित्र लावू नका.

### आरोग्यावरही विपरीत परिणाम

● बेडरुममध्येही पक्षी किंवा प्राणी नसावेत. ● घराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर पाणी, चिखल किंवा घाण साचणार नाही याची विशेष काळजी घ्यावी ↵ कारण असे झाल्यास वास्तू दोषांचा जास्त परिणाम होतो. घरातील लोकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो आणि पैशाची हानीही होते. त्यामुळे घराच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर स्वच्छता राखण्याचा प्रयत्न करा.

# घरामध्ये वास्तुदोष आहे की नाही हे कसे ओळखावे?



होम स्वीट होम

● प्रणाली म्हात्रे, मुंबई

जर घरात सगळं सुरळीत सुरू असताना हळूहळू परिस्थिती बिघडू लागली तर आपण हवालदिल होतो. नक्की काय सुरू आहे ते आपल्याला कळत नाही. पण बऱ्याचवेळा घरात वास्तु दोष निर्माण झाल्याने अडचणी येतात. त्यासाठी वास्तुदोष आहे का हे ओळखता यायला हवं. त्यासाठी घरातील छोट्या छोट्या गोष्टीकडे लक्ष द्यावे.

कारण वास्तुशास्त्रानुसार वास्तुमध्ये दोन प्रकारची ऊर्जा कार्य करते, एक सकारात्मक आणि दुसरी नकारात्मक. सर्व काही या उर्जेवर अवलंबून असते. सकारात्मक ऊर्जा जीवनात आनंद आणि उत्साह आणते, तर नकारात्मक ऊर्जा अनेक समस्या आणि तणाव निर्माण करते. केलेले कामही बिघडू लागते, पैसा जातो, तब्येत बिघडू लागते.




तुमचे कठोर परिश्रम आणि सतत प्रयत्न करूनही पैशाशी संबंधित समस्या दूर होत नाहीत आणि तुमची आर्थिक परिस्थिती अस्थिर राहते. वास्तू दोष नैऋत्य दिशेला असल्यास आर्थिक समस्या कायम राहतात. पैसा थांबत नाही. . या दिशेतील वास्तुदोषामुळे घटस्फोटाची परिस्थिती उद्भवू शकते आणि कौटुंबिक कलह दिवसेंदिवस वाढू लागतात. अशा परिस्थितीत घराच्या मुख्य दरवाजाची किंवा खिडकीची दिशा बदलणे गरजेचे आहे.



---

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष

## नारळाच्या झाडाला विद्युत तारा मुळे लागली आग;संपूर्ण झाड जाळून झाले खाक




माजलगाव : तालुक्यातील टालेवाडी येथील सखाराम आवाड यांच्या घरा समोरील नारळाच्या झाडाला सकाळी ११ वा विद्युत तारा मुळे आग लागली यात संपूर्ण झाड जाळून खाक झाले.

## अनुज काळे नवोदयसाठी पात्र



माजलगाव / प्रतिनिधी : चि. अनुज महादेव काळे देपेगावकर याची जवाहर नवोदय विद्यालय गढी जि.बीड येथे शहरी भागातून इयत्ता सहावी साठी निवड होऊन ऍडमिशन झाले त्याबद्दल अभिनंदन व सत्कार करताना सेवानिवृत्त मुख्याध्यापक संदिपान वानखेडे, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष रमेश फपाळ, जिजाऊ शिक्षक सह. पतसंस्थचे अध्यक्ष विलास शेजुळ व मराठा सेवा सघाचे उत्तम पवार आदी उपस्थित होते.

## म्हाळसजवळा ग्रामपंचायतचा काळाबाजार

● पान १ वरून... ही त्यांची दुसरी चौकशी असून या चौकशीचा अहवाल वरिष्ठांना पुढील सात दिवसांमध्ये कर्मचाऱ्यांना द्यावा लागणार आहे. जवळा येथील युवा नेते ज्ञानेश्वर खांडे यांनी जवळा येथील ग्रामपंचायत मध्ये झालेल्या सावळ्या गोंधळाची तक्रार राज्यस्तरातील वरिष्ठान कडे केलेली होती. याच तक्रारची दखल घेत आता या सर्व अनागोंदीत कारभाराची चौकशी सुरू होणार आहे. या चौकशीच्या अहवालानंतर सरपंच व ग्रामसेवकावर काय कारवाई होणार हे पाहणे महत्त्वाचे आहे.

## हजारो कुटुंबीयांना दिवाळी फराळ व दिवाळी सणाचे साहित्य वाटप

● पान १ वरून... सेवाश्रम-ब्र.येळंब, आजोळ परिवार वृद्धाश्रम-राक्षसभुवन ता.शिरुर, कामधेनु वृद्धाश्रम- कोळवाडी, ईन्फंट आश्रम-पाली, आदीवासी समीकरण, सहारा बालग्राम - गेवराई, स्नेहसावली-रामनगर, निवारा बालगृह- सौताडा यांच्यासह बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र - बीड, रोटरी अन्नछत्र - दत्तमंदिर, विहान प्रकल्पातील दुर्धर आजारग्रस्त कुंटुब आदिंचा समावेश होता. त्याचबरोबर बीड शहरातील मोंढा रोड येथील अमरधाम व इतर स्मशानभूमींची देखभाल करणाऱ्या कुटुंब आणि तृतियपथी समुदायाला पण दिवाळी फराळ व इतर साहित्य देण्यात आले.

या उपक्रमाप्रसंगी राजयोग फाऊंडेशन चे अध्यक्ष शुभम धुत, रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन चे अध्यक्ष राहुल बोरा, सचिव डॉ.प्रकाश कोंका, डॉ.सुरेंद्र बजाज, राजेश बंब, संतोष टवाणी, सुर्यकांत महाजन, सुरेश बुद्धदेव, दिनेश लोळगे, भारत शेटे, अमोल तळेकर, संजय गुप्ता, जितेंद्र बोरा, विशाखा सूर्यवंशी, सर्वज्ञ जोशी, डॉ.सुधीर येवले, नितीन भोसले, शुभम कातांगळे, ऋषभ वाघमारे, गिरीश मुंदडा, डॉ.वैभव कोठेकर, सागर वाहुळ, राजदीप धुत, मेघराज जगदाळे, संकेत करवा, वैभव जाधव, मुकुंद त्रिमुखे, अभिजित आव्हाड, ओंकार बोबडे व इतर उपस्थित होते.

# मनकॉट जिनिंगवर खासगी कापुस खरेदी सुरू ;पहिल्या दिवशी भाव 7100 रूपये



➤ माजलगाव :अरविंद ओव्हाळ
शहरातील मनकॉट जिनिंगीवर दि.१८ ऑक्टोबर २०२५ रोजी खासगी कापुस खरेदीची सुरुवात आमदार प्रकाश सोळके यांच्या हस्ते करण्यात आली असुन खरेदीच्या पहिल्या दिवशी ७१०० रूपये प्रतिकिंटल दर कापसाला देण्यात आला. शहरातील मनकॉट जिनिंग येथे दि.१८ शनिबारी खासगी कापुस खरेदीची सुरूवात करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. उद्घाटक म्हणून आमदार प्रकाश दादा सोळंके हे तर बाजार समितीचे सभापती जयतत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाऊ सवणे, बाजार समितीचे संचालक प्रभाकर होके, अच्युतराव लाटे, भगवान आगे, जुगलकिशोर नावंदर, कल्याण आबूज, मनकॉट जिनिंगचे संचालक रामेश्वर टवाणी, तेजस टवाणी यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना तेजस टवाणी म्हणाले की, आंतरराष्ट्रीय बाजारात रूईचे दर कमी असल्यामुळे खाजगी कापसाला सध्या दर कमी आहेत तर भारत देशाच्या तुलनेत इतर देशात कापसाच्या रूईचे दर कमी आहेत. त्यामुळे कापुस गठाणाची निर्यात ठप्प होते. परिणामी दरवाढ होत नाही. यंदा पावसाने शेतीपिकांचे काही प्रमाणात नुकसान झाले असुन विक्रीतही शेतक-यांचे आर्थिक नुकसान होउ नये याकरीता शेतक यांनी खासगीत कापुस विक्री न करता सिसीआय कापूस खरेदी केंद्रावरच कापूस विक्री करावा असे आवाहन त्यांनी शेतक-यांना केले. आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की, शेतक-यांना योग्य भाव मिळावा म्हणून सिसीआयची खरेदी शासनाकडुन करण्यात येणार आहे. शासन शेतक-यांप्रती संवेदनशील असुन सर्वोतोपरी मदतीसाठी कटीबध्द आहे. तसेच आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शेतक-यांनी खासगीत कापुस विक्री न करता शासकीय कापुस खरेदी केंद्रावरच कापुस विक्री करावा असे आवाहन त्यांनी केले. सुत्रसंचालन श्रीनिवास टवाणी यांनी केले.


आ. प्रकाश दादा सोळंके


जयदत्त नरवडे (आण्णा) सभापती


श्रीहरी मोरे (नाना), उपसभापती

यावेळी अच्युतराव लाटे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी गोबिंद बजाज, लक्ष्मीनारायण मुंदडा, शशिकिरण गडम, बाळु शंबर, गोपाल बजाज यांची उपस्थिती होती.

## जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये वाढदिवस साजरा करून गायकवाड परिवाराने पाडला नवीन पायंडा

➤ बीड :प्रतिनिधी
शहरात असलेल्या "जिव्हाळा बेघर निवारा केंद्र" यामध्ये गायकवाड दांपत्याने त्यांचा मुलगा रणवीर कुणाल गायकवाड याचा दुसरा वाढदिवस साजरा करून एक नवीन पायंडा पाडल्याचे पहावयास मिळाले. आपले आनंदाचे क्षण आपण केवळ एकट्यात न साजरे करता ते सामुहिक तसेच सामाजिक पद्धतीने साजरे करावे. त्यामुळे समाजात एक आदर्श तर निर्माण होईलच त्याचबरोबर मुलांना समाजाप्रती जाणिवेचे संस्कार ही घडतील. रणवीर गायकवाड याचा हा दुसरा वाढदिवस असताना, बेघर लोकांसोबत कसलाही बडे जाऊ पणं न करता हा वाढदिवस साजरा करण्यात आला. तसेच केक



कापणे या प्रथेला देखील नकार या वाढदिवसातून देण्यात आला. यावेळी बीड शहर बचाव मंचाचे डी.जी तांदळे सर, नितीन जायभाये, दैनिक बीड प्रसाराचे संपादक समीर काझी, बाजीराव ढाकणे, पत्रकार गणेश शिंदे आदी उपस्थित होते.

## डॉ.सौ. सारिका गडदे यांना पीएचडी प्रदान

### उल्लेखनीय कामगिरीचे सहकारी, मार्गदर्शक केले कौतुक

➤ माजलगाव :प्रतिनिधी
तालुक्यातील हिवरा गोवर्धन येथील येथील रहिवाशी असलेल्या डॉ.सौ. सारिका विनोद गडदे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने (एसपीपीयू) मानव संसाधन व्यवस्थापन क्षेत्रात अधिकृतपणे डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएचडी) पदवी प्रदान केली आहे.




"पुणे, महाराष्ट्रातील आयटी इंडस्ट्रीजमधील विशेष संदर्भासह कर्मचारी समाजीकरणावर कर्मचारी धारणाचा प्रभाव" या विषयावर शोध प्रबंध सादर केला होता. त्यांना डॉ. विजयश्री मेहता, डॉ. प्रियंका दरेकर यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. सारिका खांडेकर सध्या ग्लोबल बिझनेस स्कूल अँड रिसर्च सेंटर (जीबीएसआरसी), डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. समर्पण, चिकाटी आणि शैक्षणिक उत्कृष्टतेने प्रेरित त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचे सहकारी, मार्गदर्शक आणि समवयस्कांनी मोठ्या प्रमाणात कौतुक केले आहे तर त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## चिंचोली लिंबाजी नगरी त उद्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या भूमिपूजनाचा उत्सव

### दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर साधुसंताच्या पावन उपस्थितीत उद्या

### चिंचोली लिंबाजी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या कामाच्या भूमिपूजनाचा शुभारंभ





चिंचोली लिंबाजी :सचिन गुरव
कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी 40 ते 45 खेड्यांच्या मध्यभागी असलेलं खान्देश व मराठवाड्यातील शेवटच्या टोकाचं मुख्य बाजारपेठेचे गाव म्हणजे चिंचोली लिंबाजी येथे उद्या सकाळी आठ वाजता अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या जागेचा शुभारंभ सकाळी साडेआठ वाजता ऐन दिवाळीच्या मुहूर्तावर साधुसंतांच्या हस्ते संपन्न होणार आहे

शेलगाव मठाचे 1000 महामंडलेश्वर श्री श्री दयानंद महाराज, शिवेश्वर वाकी देवस्थानचे उत्तर अधिकारी, ह भ प नामदेव महाराज पल्लाळ, सुरमाळ नवनाथ गडाचे महंत108 निळकंठ महाराज सुरमाळ गड, साध्वी सविता महाराज दांडगे वाकद या महान विभूती साधुसंताच्या पावन उपस्थितीत संपन्न होणार आहे

या सोहळ्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे असे अहवान समस्त चिंचोली लिंबाजी गावकरी ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले आहे
दिवाळीचा सण अन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामाचे भूमिपूजन साधुसंत उपस्थित जन हा सोहळा म्हणजे जणूकाही स्वर्ग सोहळा असेल असा आनंद चिंचोली लिंबाजी सर्व परिसरातील ग्रामस्थ गावकरी तरुण वर्ग मित्र मंडळात दिसत आहे.



## १० कोटींच्या चिनी फटाक्यांची तस्करी :

● पान ३ वरून... बंदरात चीनहून आलेल्या एका कंटेनरची कसून तपासणी केली. यामध्ये वरच्या थरावर कपडे ठेवले होते, पण खोलवर पाहणी केल्यानंतर ४६,६४० चिनी फटाके आढळून आले. या खेपाची अंदाजित किंमत ४.८२ कोटी रुपये आहे.

तपासाअंती या तस्करीमागे असलेल्या टोळीचा शोध लागला असून, गुजरातमधील वेरावळ येथे एका मुख्य संशयिताला अटक करण्यात आली आहे. या टोळीच्या ताब्यातून बेकायदेशीर कागदपत्रे आणि साठवणूक यंत्रणेचे पुरावे देखील हस्तगत करण्यात आले आहेत.

याचप्रमाणे, तुतिकोरिन बंदरावर देखील डीआरआयने दुसऱ्या कारवाईत ८३,५२० चिनी फटाके जप्त केले आहेत. या फटाक्यांना 'इंजिनिअरिंग गुड्स' म्हणून चुकीचं लेबल लावून देशात आणण्याचा प्रयत्न केला जात होता. हे फटाके सिलिकॉन सीलंट गनच्या झाकणाखाली लपवण्यात आले होते. ही खेप सुमारे ५.०१ कोटी रुपये किमतीची होती.

अशा प्रकारच्या बेकायदेशीर आयातीवर बंदी आहे.

## एसबीआय बँक अधिकारी संघटनेचे महाराष्ट्र राज्य महासचिव डॉ.सतीश टाके यांची केज येथे स्वामी समर्थ मठात सदिच्छा भेट

➤ केज : प्रतिनिधी
नुकत्याच झालेल्या एसबीआय बँकेच्या अधिकारी संघटनेच्या निवडणुकीत महासचिव म्हणून निवडून आलेल्या डॉ.सतीश टाके यांनी केज येथील श्री स्वामी समर्थ मठात भेट दिली.यावेळी त्यांनी श्री.स्वामी समर्थांच्या बाल रूपातील अजानबाहु मुर्तीचे व पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी श्री स्वामी समर्थ मठाचे विश्वस्त मंदार देशपांडे यांनी त्यांचे स्वागत केले व श्री स्वामी समर्थांची मूर्ती देवून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी गणेश देशपांडे, दिनेश देशपांडे, राजेश देशपांडे,विनायक टोंबरे, रोहन वेदपाठक, संतोष रिनवा यांची उपस्थिती होती.



# लोकशाही पत्रकार संघाच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी बबनराव आंधळे यांची निवड

➤ बीड :प्रतिनिधी
लोकशाही पत्रकार संघाच्या शिक्षण विकास समितीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी बबनराव आंधळे यांची निवड संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंखे, प्रदेश अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र निलोफर शेख, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब खान, प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी, वसीम आजाद यांच्या आदेशानुसार मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी केली. या निवडीच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे ज्येष्ठ नेते जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील हे होते. तर यावेळी व्यासपीठावर संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ, जेष्ठ पत्रकार कचरे, डिजिटल मीडियाचे प्रदेश उपाध्यक्ष नितेश उपाध्ये, बीड जिल्हा उपाध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट, बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी आदी उपस्थित होते. या वेळी प्रज्जवल सिरसाट यांचा वाढदिवस देखील साजरा करण्यात आला.

या निवडीच्या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना जेष्ठ पत्रकार कचरे म्हणाले की, पत्रकारांनी एकजुटीने राहिले पाहिजे. एकमेकांचे उणे दुणे काढू नये एकमेकांना नावे न ठेवता. पत्रकारांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत. पत्रकारासाठी घरकुल सहित कॉम्प्लेक्स पाहिजे यासाठी आपण मंत्रालय स्तरावर प्रयत्न करू. त्यानंतर संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य बोलताना म्हणाले की, लोकशाही पत्रकार संघ सलग्न विविध 72 विकास समित्या काम करत आहेत. लोकशाही पत्रकार संघातील राज्याभरातील सर्व पदाधिकारी एक दिलाने, तन-मन-धन अर्पण करून काम करत आहेत. राज्यातील सर्व पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी मी स्वत: राज्यात दौरा करणार आहे. यावेळी सर्व पत्रकारांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी भरीव असे काम करणार आहे. शिवाय लवकरच बीड येथे विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यांनतर नितेश उपाध्ये, संजय कुलकर्णी, बाजीराव ढाकणे, शिवप्रसाद सिरसाट यांनी नवनियुक्त



जिल्हाध्यक्ष बबनराव आंधळे सर यांना शुभेच्छा दिल्या. बबनराव आंधळे यांनी आपल्या निवडी बाबतीत म्हणाले की, माझ्यावर जि शिक्षण विकास समितीची जबाबदारी दिली ती मी योग्य पद्धतीने कामकाज करून दाखवीन लोकशाही पत्रकार संघांनी आमच्या पाठीशी खंबीर पणे साथ द्यावी. काही शिक्षक सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांना सी ई टी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. असा नियम राज्य सरकारने लागू केला आहे. तो तात्काळ रद्द करण्यात यावा यासाठी पहिले काम माझे असेल असे आंधळे सर म्हणाले.त्या नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे यांनी अध्यक्षीय समारोप केला. यावेळी नवनाथ अण्णा शिराळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना नवनाथ अण्णा शिराळे म्हणाले की, बीड जिल्ह्यासह राज्यातील अनेक पत्रकार निर्भीडपणे पत्रकारितेचे काम करत आहेत.
त्यामुळे समाजातील गोरगरीब सामान्य जनतेला न्याय मिळत आहे.

बीड जिल्ह्यातील विशेषत: लोकशाही पत्रकार संघाच्या प्रत्येक पत्रकारांनी निर्भीडपणे अन्य अत्याचाराच्या विरोधात आपली लेखणी चालवावी. बीड जिल्ह्यातील लोकशाही पत्रकार संघाच्या प्रत्येक पत्रकारांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे. यापुढेही मी आपल्या पाठीशी खंबीर उभा राहीन. प्रत्येकाला माझे सहकार्य राहील असे आश्वासन दिले. राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. बीड नगर परिषदेची निवडणूक भाजप स्वबळावर लढणार आहे. बीड नगर परिषदेमध्ये भाजपाची सत्ता येणार आहे. डॉ भीमराव आंबेडकर यांची लेख या बीड नगर परिषदेची नगराध्यक्ष होणार आहे. बीड नगर परिषदेवर गेली 40 वर्षापासून क्षीरसागर यांची सत्ता आहे. आता मात्र क्षीरसागर मुक्त बीड नगरपरिषद होणार आहे. आणि या परिवर्तनामध्ये पत्रकारांचा मोठा वाटा असणार आहे असेही नवनाथ अण्णा शिराळे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी बीड न.प. मधील भ्रष्टाचाराची माहिती दिली.

या निवडणुकीत नगर परिषद आणि व जिल्हा परिषदेमध्ये भाजपाची एक हाती सत्ता येणार आहेत. त्यामुळे बीड शहरा पाठोपाठ जिल्ह्यातील नागरिकांना चांगल्या सुख सोयी आम्ही उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन मराठवाड्याचे विभागीय कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी केले. तर आभार बाजीराव ढाकणे यांनी मानले. या बैठकीला बीड शहरातील लोकशाही पत्रकार संघाचे पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.